“ ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ”

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे

स्थापना १९४४

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९७५-७६ (शके १८९७-९८) वर्ष ३२ वे

## वार्षिक वृत्तान्त व समाव्यय

(पुढील वर्षाच्या निकल्पासह)

(वार्षिक निकाय सभेचे निमंत्रण व सभासदांस विनंती यासाठी मलपृष्ठ २ पहावे.)

प्रकाशक

स. चिं. मराठे, बी. ई.

वि. वि. सोवनी, बी. एस्सी.

कार्यवाह

BOOK-POST

To,

श्री.

प्रेषक :
ज्योतिर्विद्या परिसंस्था,
७२१।१।१० नवी पेठ,
पुणे ३०.

## वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण

चालू ३३ व्या वर्षाची निकाय सभा (जनरल बॉडी मीटिंग) रविवार दि. १७-१०-७६ ला (भारतीय सौर दि. २५ आश्विन शके १८९८) सायंकाळी ६ वा. न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड येथे भरेल. त्या वेळच्या कामकाजाची क्रमणिका खाली दिली आहे. तरी सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित राहावे ही विनंती.

### क्रमणिका

दिवंगत सभासदांविषयी दुखवटा

(१) दि. २५।४।७६ च्या वार्षिक निकाय सभेच्या इतिवृत्तास मान्यता.
(२) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधाने गतवर्षातील कार्याचे निवेदन.
(३) गतवर्षाच्या समाव्ययास मान्यता.
(४) १९७६-७७ साठी पदाधिकाऱ्यांची निवड.
(५) १९७६-७७ मध्ये हाती घ्यावयाची कामे.
(६) १९७६-७७ च्या निकलपावर चर्चा.
(७) आयत्या वेळेचे विषय (अध्यक्षांच्या अनुमतीनें).
(८) प्राध्यक्षांचे भाषण.
(९) आभार.

पुणे, भारतीय सौर दि. १७ आश्विन शके १८९८.
९ ऑक्टोबर १९७६.

आपले
**श्री. स. चिं. मराठे**
**श्री. वि. वि. सोवनी**
**कार्यवाह**

**टीप :–** सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी कृपया सभेपूर्वी तीन दिवस, कार्यवाह यांचेकडे तसे लेखी कळवावे.

---

### विनंती

परिसंस्थेची सामान्य सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. तीन आहे, तरी आपली १९७६-७७ ची वर्गणी व तसेच मागील वर्षाची वर्गणी राहिली असल्यास परिसंस्थेस त्वरित देण्याची कृपा करावी.

**" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ! "**

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे.

**स्थापना :– गणेशचतुर्थी शके १८६६ दि. २२-८-१९४४**

## सन १९७५-७६ (शके १८९७-९८) चा
## ३२ व्या वर्षाचा वृत्तान्त

ज्योतिर्विद्या परिसंस्थेने आता ३३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दि. ३० जून १९७६ ला संपलेल्या ३२ व्या वर्षातील संस्थेच्या कार्याचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आपणास सादर करण्यास प्रशासक मंडळास आनंद होत आहे.

## सन १९७५-७६ मधील पदाधिकारी

### प्रशासक मंडळ (Governing Council)

**प्राध्यक्ष :–** प्रि. गो. रा. परांजपे, एम. एस्सी., एफ. एन. आय.; ओ. बी. ई. (निवृत्त)

**उपाध्यक्ष :–** (१) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
(२) डॉ. मो. वा. चिपळूणकर, डी. एस्सी.

**वैधिक :–** श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.

**कार्यवाह :–** (१) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.
(२) श्री. वि. वि. सोवनी, बी. एस्सी.

सदस्य :– ( १ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री, ज्योतिर्गणिताचार्य व ज्योतिषालंकार.

( २ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.

( ३ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.

( ४ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.

( ५ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.

( ६ ) श्री. वि. वि. मोडक, जी. सी. डी., जी. सी. सी.

( ७ ) श्री. ग. य. दीक्षित, एम्. ए.

( ८ ) प्रा. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.

( ९ ) प्रा. य. रा. पाटणकर, एम्. एस्सी.

(१०) प्रा. सू. शां. चौबळ, एम्. एस्सी.

(११) श्री. अ. वि. घुळे, डी. एम्. ई., पी. डी. ए. ई.

अंतर्गत अधीक्षक :– श्री. वा. रा. मराठे, बी. ए.

समाव्यय अधीक्षक :– श्री. जी. डी. आपटे आणि कं. चार्टर्ड अकाउंटन्टस्

## तद्विद्य मंडळाचे सभासद ( Academic Council )

(१) प्रा. वि. वा. नारळीकर

(२) प्रि. गो. रा. परांजपे

(३) डॉ. मो. वा. चिपळूणकर

(४) प्रा. ना. म. आठवले

(५) प्रा. द. श्री. जोग

(६) श्री. मा. भ. पंत (निमंत्रक)



# वृत्तान्तवर्षातील कार्यांचे इतिवृत्त

## सभा–बैठकी

### प्रशासक मंडळाच्या सभा

दि. २८।१२।७५ रोजी झालेल्या प्रशासक मंडळाच्या सभेत सन १९७४–७५ (शके १८९६–९७) च्या वार्षिक वृत्तान्ताच्या खर्डास व समाव्ययास मान्यता घेण्यात आली; तसेच सन १९७५–७६ (शके १८९७–९८) च्या निकल्पाचा खर्डा मान्य करण्यात आला.

### वार्षिक निकाय सभा

वार्षिक निकाय सभा दि. २५।४।७६ (भारतीय सौर दि. ५ वैशाख शके १८९८) रोजी सायं. ५ वा. न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे येथे भरली होती. प्राध्यक्ष प्रि. गो रा. परांजपे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारून सभेच्या कामास सुरुवात झाली. प्रथम सर्व हजर सभासदांनी १ मिनीट स्तब्ध उभे राहून दिवंगत सभासदांबद्दल दुखवटा व्यक्त केला. त्यानंतर कार्यवाहांनी आधीच्या निकाय सभेचा वृत्तान्त वाचला व हा वृत्तान्त आणि पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेला गतवर्षीचा कार्यवृत्तान्त व समाव्यय सभेने संमत केले. नंतर नव्या वर्षाकरिता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. कार्यवाहांनी सुचविलेले मंडळ सभेने संमत केले.

पुढील वर्षाकरता मांडलेल्या निकल्पाच्या अनुषंगाने व संस्थेने हाती घ्यावयाच्या कामांच्या दृष्टीने सभेत पुढील सूचना मांडल्या गेल्या व त्यावर चर्चा झाली :

१. प्रि. गो. रा. परांजपे– सध्याच्या शालेय अभ्यासक्रमाला सहाय्यभूत होतील अशी व्याख्याने संस्थेने घडवून आणावीत व त्यासाठी आवश्यक तो अभ्यासक्रम तयार करावा. या सूचनेप्रमाणे काही प्रयत्न सुरू असल्याचे श्री. मो. ना. गोखले यांनी सांगितलें.

२. प्रा. प्र. वि. सोवनी– (अ) शिक्षणाधिकाऱ्यांनी अभ्यासक्रमाविषयी सूचना मागविल्या आहेत, तेव्हा संस्थेने आपल्या सूचना पाठवाव्यात.

(ब) टिळक रोड न्यू इंग्लिश स्कूलमधील परिभादर्श (प्लॅनेटोरियम्) व फर्ग्युसन कॉलेजला श्री. नानासाहेब आठवले यांनी दिलेली दुर्बिण या साधनांचा अधिक उपयोग व्हावा याकरता संस्थेने सहकार्य करावे.

(क) अवकाश संशोधनातील प्रमुख घटनांची दैनंदिनी । जंत्री संस्थेने ठेवावी.

या शेवटच्या सूचनेचे कार्य अवाढव्य असल्याने केवळ प्रमुख घटनांची जंत्री ठेवणे परिसंस्थेस शक्य होईल असे डॉ. चिपळूणकर यांनी सांगितले.

३. महामहोपाध्याय प्रा. द. वा. पोतदार–परिसंस्थेच्या व्यवहारात जानेवारी फेब्रुवारी इ. केवळ पाश्चात्य कालगणना न वापरता भारतीय कालगणनेचाही वापर व प्रचार–प्रसार व्हावा. या सूचनेनुसार इतःपर व्यवस्था होईल असे कार्यवाहांनी सांगितले.

४. श्री. वाडेकर यांनी संस्थेच्या दुर्बिणीच्या साहाय्याने आकाशनिदर्शनाचे कार्यक्रम अधिक व्हावेत असे सुचविले. दुर्बिणीत झालेले बिघाड काढून ती लवकरच दुरुस्त करून घेऊ असे श्री. नेने यांनी सांगितले.

५. डॉ. मो. वा. चिपळूणकर– संस्थेस कार्यालयाची जागा प्राप्त झाल्यावर तेथे नित्य जाऊन कार्यकर्त्यांना विविध कार्ये करता येतील. उदा.– महत्त्वाचे उतारे काढणे, चित्रे, नकाशे तयार करणे, टाइपिंग करून पत्रव्यवहारास साह्य करणे. कार्यकर्त्यांनी कार्यवाहांना कळवून ही कार्ये करावीत.

समारोपाच्या भाषणात प्राध्यक्ष प्रि. परांजपे यांनी शिक्षकांना या विषयाचे बिनचूक ज्ञान मिळावे याकरता संस्थेने सर्व प्रकारे प्रयत्न करावे असे आग्रहाने प्रतिपादिले.

आभार, चहापानानंतर सभेचे काम संपले.

## अभ्यासमंडळाच्या सभा

परिसंस्थेस स्वतःची जागा उपलब्ध न झाल्याकारणाने गतवर्षीप्रमाणेच या वर्षीही अभ्यासमंडळाच्या सभा दर रविवारी सायंकाळी ५ ते ७ पर्यंत, ज्ञान-प्रबोधिनी प्रशाला, पुणे येथे भरत असत. या सभांना साधारणतः सहा सभासद उपस्थित असत. या सभांमध्ये चर्चिले गेलेले प्रमुख विषय असे :– (१) धूमकेतू ‘ वेस्ट ’ चे आगमन व त्याचे इतिवृत्त. (२) १३ मे रोजी झालेले चंद्रग्रहण. (३) कृष्ण विवरांचे विज्ञान. (४) दुसऱ्या ग्रहांवर सजीव सृष्टीची संभाव्यता. (५) पृथ्वीगतीमुळे घडणारे ताऱ्यांचे प्रच्यवन. (६) पदार्थाचे वजन रात्री व दिवसा केल्यास त्यात फरक पडेल काय ? (७) प्राचीन भारतीय ग्रंथात आढळणाऱ्या शास्त्रीय गोष्टी. (८) “ हिस्टरी ऑफ ॲस्ट्रानॉमी फ्रॉम थेल्स् टु केप्लर ” या पुस्तकात दिलेल्या ग्रहांच्या नावांना कटपयादि सूत्र लावले असता निघणारा अर्थ. (९) ग्रहांच्या स्तंभी स्थितीचे गणिताने स्पष्टीकरण. (१०) कटपयादि सूत्राचा काळ इ. स. ५०० असताना ते सूत्र वेदांचा अर्थ लावण्यासाठी वापरण्यामधील इष्टानिष्टता इत्यादि.



## नवसदस्यांचे स्वागत

**सन १९७५–७६ (शके १८९७–९८) मधील नवीन सभासद**

**सामान्य सभासद**

(१) श्री. अ. र. सराफ
(२) श्री. ए. वा. आळतेकर
(३) श्री. व्ही. व्ही. जोशी
(४) श्री. के. जी. भानू

**आजीव सदस्य**

(१) श्री. एस्. जी. खामकर

## संस्थेच्या ग्रंथसंग्रहालयात पडलेली भर

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या कलकत्याच्या ॲलमॅनॅक विभागाकडून १९७६ आणि १९७७ या दोन वर्षांच्या इंडियन एफेमेरिज् ॲण्ड नॉटिकल ॲलमॅनॅक ची खरेदी करण्यात आली. तसेच दर महिन्यास प्रसिद्ध होणारे ॲस्ट्रॉनॉमिकल बुलेटीनही यांच्याकडून संस्थेस मोफत येत असते.

### संस्थेकडे येणारी नियतकालिके

(१) सायन्स रिपोर्टर.
(२) सायन्स टुडे.
(३) सृष्टिज्ञान.
(४) बेल्जियम वेधशाळेची सर्व संशोधनपर प्रकाशने.

## वृत्तान्तवर्षातील कार्याचा आढावा

वृत्तान्तवर्षात संस्थेने आकाशनिदर्शने, व्याख्याने, लेख इ. प्रकारांनी ज्ञान-प्रसाराचे काम चालू ठेवले होते. त्यामधील काही ठळक कार्यक्रम :–

(१) वार्षिक सभेत केलेल्या सूचनेनुसार न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड पुणे, येथे त्या शाळेतील इ. १० वी च्या जिज्ञासू मुलांसाठी खगोल व भूगोल या विषयासंबंधाने शास्त्रीय ज्ञान देण्यासाठी दर रविवारी एक वर्ग चालविला होता. हा वर्ग जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर १९७५ असे ३ महिने चालू होता. व्याख्याने

श्री. मो. ना. गोखले, श्री. य. रा. नेने यांनी दिली. (२) धूमकेतू ' वेस्ट सापडण्याचा त्रोटक वृत्तान्त ' टाइम्स ऑफ इंडिया ' मध्ये आला होता. त्याच्या अनुरोधाने श्री. मो. ना. गोखले यांनी अधिक माहिती मागवून धूमकेतूचा संभाव्य मार्ग ताराचित्रकांवर निश्चित केला व धूमकेतूच्या तेजस्वितेतील बदल दाखविणारा आलेख तयार केला. या सर्व माहितीचे अनुरोधाने दि.१३।२।७६ पासून पश्चिम आकाशात सूर्यास्तानंतर मीनास्य ताऱ्याच्या पश्चिमेकडून उपसूर्य बिंदूकडे धूमकेतू येत असताना तो शोधण्याचा प्रयत्न साध्या डोळ्यांनी व द्विनेत्रींच्या साह्याने केला–पण त्यावेळेस धुमकेतू दिसू शकला नाही. नंतर दि.२१।३।७६ पासून तो सूर्योदयापूर्वी पूर्व आकाशात दिसू लागला. त्यासंबंधी एक खास वृत्त तयार करून ते सर्व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केले. (३) मराठी विज्ञान परिषदेच्या, पुणे शाखेच्या सभासदांसाठी दि. २८।३।७६ रोजी रात्री आकाश निदर्शनाचा व शंका-समाधानाचा कार्यक्रम करण्यात आला.

नवीन पिढीत ज्योतिष्यकीय आविष्कारांचे वेध घेण्याबद्दल जिज्ञासा उत्पन्न होण्याची आवश्यकता आहे. याकरिता दि. १८–१९ नोव्हेंबर १९७५ च्या खग्रास चंद्रग्रहणाचे वेध घेऊन ते ज्योतिर्विद्या परिसंस्थेकडे धाडावे असे आवाहन करण्यात आले होते. चांगल्या ठरणाऱ्या वृत्तान्तास एक पारितोषक देण्याचेही जाहीर केले होते. परंतु यास काहीही प्रतिसाद मिळाला नाही. डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी स्वतः साध्या डोळ्यांनी घेतलेल्या वेधांचा वृत्तान्त स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केला.

संस्थेस स्वतःची जागा नसल्यामुळे यापेक्षा अधिक कार्य सातत्याने होऊ शकले नाही.



## ज्योतिर्विद्या परिसंस्था, १९७६-७७ (शके १८९८–१८९९) चा निकल्प

| आय | रु. पै. | व्यय | रु. पै. |
|---|---|---|---|
| (१) सामान्य सदस्य वर्गणी | २५०–०० | (१) कचेरी खर्च, वेतन, विशेष वेतन | ६५०–०० |
| (२) देणग्या (अनुदान शासकीय– ३०० अनुदान महानगरपालिका–२००) | ५००–०० | (२) जागाभाडे, अहवालमुद्रण, स्टेशनरी, प्रचारमुद्रण, टपाल हशील | ९००–०० |
| (३) व्याज | २८०–०० | (३) उद्देश, कार्य खर्च ग्रंथसंग्रह अभ्यासमंडळ, स्फुट व्याख्याने, चित्रपट, खगोल निदर्शन | १०००–०० |
| (४) आजीव सदस्य शुल्क | १००–०० | (४) कायम निधी | १००–०० |
| (५) प्रकाशनविक्री | ५०–०० | | |
| | ११८०–०० | | |
| अपेक्षित तूट | १४७०–०० | | |
| एकूण रु. | २६५०–०० | एकूण रु. | २६५०–०० |

टीप : गतवर्षीचा समाव्यय व तपासनिसांकडून आलेली प्रमाणपत्रे सोबत स्वतंत्र पत्रकात दिली आहेत.

मो. वा. चिपळूणकर — अध्यक्ष

## JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

### Receipts and Payments Accounts for the year ending 30-6-76

| Receipts | | Rs. Ps. |
|---|---|---|
| 1 SUBSCRIPTION | | 278–00 |
| a) Ordinary Members | 177 | |
| b) Life members | 101 | |
| 2 DONATIONS | | |
| a) Foundation Fund ‡ | 00–00 | |
| b) Petty donations ‡ | 25–00 | 25–00 |
| ( ‡ Presently included in Buld. & Equipment Fund) | | |
| 3 GRANT IN AID | | |
| i) Poona Municipal corp. | | 200–00 |
| 4 SALE OF BOOKS | | 40–00 |
| 5 INTEREST ON BANK DEPOSITS | | 404–41 |
| Opening Balance As on 1–7–75 | | |
| Cash in hand | 91–79 | |
| Cash in bank | 5286–41 | 5378–20 |
| 6 MISC. RECEIPTS | | Nil |
| To' Rs. | | 6325–61 |

| Payments | | Rs. Ps. |
|---|---|---|
| 1 ESTABLISHMENT EXPENSES | | |
| a) Salary | 453–70 | |
| b) Printing and Stationery | 185–00 | |
| c) Conveyance | 5–50 | |
| d) Postage and revenue stamps | 20–70 | |
| e) Office expenses | 14–05 | |
| f) Contingencies (Annual meeting) | 23–90 | 702–85 |
| 2 MISC. EXPENDITURE ON OBJECT | | |
| i) Study circle | Nil | |
| ii) Commission on sale of books | Nil | |
| iii) Library books | 45–50 | 45–50 |
| 3 EQUIPMENT | Nil | Nil |
| Closing Balance as on 30–6–76 | | |
| Cash in hand | 69–44 | |
| Cash in Bonk | 5382–82 | 5452–26 |
| | | 6325–61 |

Examined and found correct
Sd. for G. D. APTE and Co.
CHARTERED ACCOUNTANTS

Sd. V. R. Marathe
Internal Auditor



G. D. APTE & Co.
Chartered Accountants

Phone : 45892
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona–2

Schedule IX
vide Rule 17 (1)
Registered No. F-44

Dated : 14 August 76

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

### Income and Expenditure Account for the year ending 30 th June 1976

| EXPENDITURE | | Rs. Ps. | INCOME | Rs. Ps. |
|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses : | | | By Interest on Bank A/c | 404–41 |
| Salary | 453–70 | | By Donations | |
| Rent | Nil | | Earmarked in kind | |
| Print. Stationery | 185–90 | | or cash | 25–00 |
| Conveyance | 5–50 | | Grants | 200–00 |
| Postage | 20–70 | | By General Subscription | 177–00 |
| Other expenses | 37–95 | 702–85 | By Sale of Books | 36–00 |
| Audit fee | | 25–00 | By Deficit carried | |
| To Research Fund | Nil | | over to Balance Sheet | 543–29 |
| To Depreciation : | | | | |
| Library Books | | | | |
| Furniture and Deadstock | | | | |
| Equipment | | 632–85 | | |
| To Transfers to Specific Funds : | | | | |
| Building & Equipment Fund | | 25–00 | | |
| To expenditure on objects of the trust educational | | Nil | | |
| Total Rs. | | 1385–70 | | 1385–70 |

Dated at Poona 23 August 1976
Trustees Sd. S. C. Marathe
Secretary
Sd. Y. R. Nene
Treasurer

As per our report of even date
Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants,
Auditors

G. D. APTE & Co. Schedule VIII (पृ. १२)
Chartered Accountants vide Rule 17 (1) : Date 14 August 1976
Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA
Balance Sheet as on 30 th June 1976

| FUNDS & LIABILITIES | | Rs. Ps. |
|---|---|---|
| Trust Fund or Corpus | | 1,983–25 |
| Research Reserve Fund : | | |
| as per last B/S | 5500–00 | 5500–00 |
| Permanent Fund : (Life membership subscription) | | |
| as per last B/s —— | | 1201/1302–00 |
| Addition during year | 101 | |
| Building & Equipment Fund | | |
| As per last B/S | 7814–00 | |
| additions during the year | 25–00 | 7839–00 |
| Liabilities | | NIL |
| **Total** | | **Rs. 16624–25** |

| Assets | | | Rs. Ps. |
|---|---|---|---|
| Library Books | | | |
| As per last B/S | 1093–00 | | |
| Additions during the year | 45–50 | | |
| | 1138–50 | | |
| Less depriciation | 113–85 | | 1024–65 |
| Furniture & Deadstock | | | |
| as per last B/s | 303–00 | | |
| Less Depn. | 30–30 | | 272–70 |
| Equipment | | | |
| as per last B/S | 4887–00 | | |
| Additions in kind during the year | Nil | | |
| Less Depn. | 488–70 | | 4398–30 |
| Stock of publications (Books) | | | 2165–41 |
| Cash & Bank Balance | | | |
| Cosmos Co-op. Urban Bk. Ltd, in S/B A/c | | | 5382–82 |
| with Secretary | | | 69–44 |
| Income expenditure A/C as per last B/S | 2767–64 | | |
| Add/deficit as per I/E A/c | 543–29 | | 3310–93 |
| **Total** | | | **Rs. 16624–25** |

The above balance sheet to the best of our belief contains a true account of the funds & liabilities and of property and assests of the trusts.

Dated 23-8-76 (Sd)

For Trustees For G. D. APTE–Co.

S. C. Marathe, Y. R. NENE (Sd) Chartered Accountants

## सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, नक्षत्रे, धूमकेतू इत्यादींची समग्र माहिती

पुरविणारी

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेची प्रकाशने

### उपयुक्त व संग्राह्यच

(१) **सूर्यकुल**– प्रथमावृत्ती संपली आहे.

(२) **तारकानगरी**–तारकांनी व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयी उद्‌बोधक माहिती तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचे स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गती कशा काढतात, अंतराळातल्या अनेक विश्वांचे स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. या प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीने पारितोषिक देऊन गौरविले आहे व विद्वानांनी प्रशंसिले आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत रु. ८–००.

(३) **ताराचित्रक संच**– (आवृत्ती दुसरी, दोन रंगात छपाई) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे, तसेच तारीख, वेळेवरून आकाशाचे कोणते दृश्य दिसू शकेल त्याचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमे ४० × ३० व २७ × २२॥ इंच. सोबत खुलासा विवरण पुस्तिकाही मिळते. सर्व संचाची किंमत रु. ५–००.

(४) **वेधसाधने व वेधशाळा**– प्राचीन काळापासून वेध घेण्याची साधने कोणती होती, त्यांची वाढ व परिणती पुढे कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचे सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्योतिषक (Radio Astronomy) या विषयांची माहिती या ग्रंथात सुबोध रीतीने दिली आहे. कि. रु. ७–००

(५) **चंद्रप्रभा**– चंद्राचे वाङ्‌मयातील उल्लेख, चंद्रामुळे पंचांग कसें बनते, चंद्रावर वसाहत करणे कितपत शक्य आहे, चंद्राची ग्रहणे, भरती, आहोटी वगैरेसंबंधाने खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्सलेशन सोसायटीने पारितोषिक देऊन गौरविलेले पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. ६–००.

प्रकाशक : वि. वि. सोवनी, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, ७२१/१/१०, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे ३०.
मुद्रक : म. वा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, २७ बुधवार पुणे २.

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम्"

★ ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें ★

१५७१, सदाशिव पेठ,
पुणें ३०.

## दिवंगत सभासदांविषयी कृतज्ञता

वृत्तांत वर्षात संस्थेचे पुढील सभासद दिवंगत झाले.

१) श्री. वासुदेव रघुनाथ बर्वे ४ नोव्हे १९७५

२) श्री. अनंत विष्णु दातार मार्च १९७६.

३) श्री. दत्तात्रय गो. घाणेकर

संस्था त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

[illegible] कार्यवाह

मा. वा. चिपळूणकर
अध्यक्ष